महापालिका आयुक्त कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
जा.क्र. ठामपा/आयुक्त/आदेश/शविवि/ ७७७
दिनांक :- १०/०६/२०२१.

## स्थायी आदेश

**विषय :- शहर विकास विभागातील कामकाजामध्ये सुसूत्रता आणणे तसेच जलदगतीने कामकाज होण्याच्या दृष्टीने कार्यपध्दती निश्चित करणेबाबत.**

**संदर्भ :-** कार्यालयीन आदेश क्र.ठामपा/आयुक्त/शविवि/२०८/२०२०, दि.०१.०९.२०२०

संदर्भिय आदेशामध्ये खालील प्रमाणे मंजूरीबाबत सुधारीत अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

**१) शहर विकास विभागातील विकास प्रस्तावांतर्गत अतिरिक्त चटई क्षेत्र अधिमूल्य व Ancillary FSI (Additional Premium FSI & Ancillary FSI) मंजूरीचे आधिकार खालील प्रमाणे प्रदान करण्यात येत आहेत.**

अ) ०.४ हेक्टर पेक्षा कमी निव्वळ भुखंड असलेल्या विकास प्रस्तावांतर्गत चे अधिकार उप नगर अभियंता, शहर विकास विभाग यांचेकडे प्रदान करण्यात येत आहे.

ब) ०.४ हेक्टर ते १ हेक्टर मधील निव्वळ भुखंड असलेल्या विकास प्रस्तावांतर्गत चे अधिकार सहायक संचालक नगर रचना यांचेकडे प्रदान करण्यात येत आहे.

क) १ हेक्टर वरील निव्वळ भुखंड असलेल्या विकास प्रस्तावाचे मंजूरीचे अधिकार आयुक्त यांचेकडे राहतील.

तथापि उक्त प्रस्तावांमध्ये जर विकास नियंत्रण नियमावली / एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली - २०२० नुसार सुट देणे आवश्यक असेल तर, अशी सुट देण्याचे अधिकार आयुक्त यांचेकडे राहतील.

**२) विकास हक्क प्रमाणपत्रांतर्गत हस्तांतरण (Transfer) व वापर वजावटीची (Utilisation) कार्यवाही करणेसाठी मंजूरीचे अधिकार खालील प्रमाणे प्रदान करण्यात येत आहेत.**

अ) विकास हक्क हस्तांतरणाबाबत नोंदणीकृत ट्रान्सफर डीड दाखल असेल तर त्यामधील डी.आर.सी. चा तपशिल व ट्रान्सफर क्षेत्र तपासून तसेच संपूर्ण व्यवहार पूर्ण झाल्याची ट्रान्सफर डीड मध्ये नोंद तपासून विकास हक्क प्रमाणपत्र (DRC) अंतर्गत हस्तांतरणाबाबतची प्राथमिक मंजूरी व प्रमाणपत्रावर अंतिम हस्तांतरणाकरीता स्वाक्षरी करण्याचे अधिकार सहायक संचालक नगर रचना यांना प्रदान करण्यात येत आहेत.

ब) १) १०००.०० चौ.मी. पर्यंतचे निव्वळ भुखंड असलेल्या प्रस्तावांतर्गत विकास हक्क वापर वजावट **(Utilisation)** अनुज्ञेय करणेबाबत मंजूरीचे अधिकार सहायक संचालक नगर रचना यांना प्रदान करण्यात येत आहे.

२) १०००.०० चौ.मी. वरील निव्वळ भुखंड असलेल्या प्रस्तावांतर्गत विकास हक्क वापर वजावट **(Utilisation)** अनुज्ञेय करणेबाबत मंजूरीचे अधिकार आयुक्त यांचेकडे राहतील.

10-06-21.



Scanned with CamScanner

क) विकास हक्क वापर वजावट (**Utilisation**) मंजूरीनंतर अंतिम वजावटीची कार्यवाहीकरीता डी.आर.सी. प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करण्याचे अधिकार सहायक संचालक नगर रचना यांना प्रदान करण्यात येत आहे.

**३) विकास प्रस्तावांतर्गत मंजूरीचे अधिकार.**

एक हेक्टर वरील निव्वळ भुखंड असलेल्या विकास प्रस्तावाच्या अभिन्यास मंजूरीचे अधिकार आयुक्त यांचेकडे राहतील. सदर प्रस्तावांमध्ये भुखंडाच्या क्षेत्रांमध्ये वाढ होत नसल्यास, सुट / सवलत देणे, धोरणात्मक निर्णयाच्या बाबी यांचा समावेश नसल्यास सुधारीत परवानगी / बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र, मंजूर करण्याबाबतची कार्यवाही सहायक संचालक नगर रचना यांचे स्तरावर करण्यात यावी.

उपरोक्त सुधारणां व्यतिरिक्त संदर्भिय आदेशान्वये सोपविण्यात आलेले अन्य कामकाज कायम आहे.

10-06-21

डॉ. विपिन शर्मा भाप्रसे
महापालिका आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

प्रत :- १) सहायक संचालक नगर रचना, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
२) उप नगर अभियंता, शहर विकास विभाग, ठामपा, ठाणे.
३) स्वीय सहाय्यक, आयुक्त कार्यालय, ठामपा, ठाणे.



Scanned with CamScanner